| | |
|---|---|
| | दाखल दिनांक : १८.११.२०२१<br>नोंदणी दिनांक : १८.११.२०२१<br>निकाल दिनांक : ०४.०५.२०२६<br>कालावधी : व. म. दि.<br>०४ ०५ २२ |

भाग अ

अतिरिक्त सत्र न्यायालय, वैजापुर, जि. औरंगाबाद येथील न्यायालयात
(पिठासिन अधिकारी श्रीमती एस. के. उपाध्याय, यांचे समोर)

विशेष खटला क्र. ६६ / २०२१ निशाणी क्रमांकः५३

| | |
|---|---|
| गुन्हा क्रमांक व पोलीस ठाणे | ३२३ / २०२१<br>वैजापुर पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासन, मार्फत – पोलीस उप निरीक्षक, वैजापुर पोलिस स्टेशन, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. |
| उपस्थिती | | सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री के.एस.गंडे. |
| आरोपी | | सुनिल गोरख बत्तीसे, वय - २५ वर्षे, धंदा - मजुरी, राहणार- दत्तनगर वैजापुर, जिल्हा औरंगाबाद. |
| उपस्थिती | | आरोपीतर्फे विधिज्ञ राफे हसन. |

विभाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३.०८.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १०.०८.२०२१ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | १६.११.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०३.०८.२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ११.१२.२०२५ |

| | |
|---|---|
| निकाल आरक्षित केल्याचा दिनांक | ३०.०४.२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | ०४.०५.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | -- |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | आरोप ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष केले किंवा शिक्षा दिली | कोणती शिक्षा दिली | खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सुनिल गोरख बत्तीसे | ११.१०.२०२१ | १७.१२.२०२१ | कलम ३६३, ३६६, ३७६(२)(एन) भा.द.वि व कलम ४ पोक्सो कायदा. | निर्दोष सुटका | -- | -- |

## भाग क

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

अ. अभियोग पक्ष -

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१/नि.क्रं. २२ | पिडीतेची आई | फिर्यादी (फितुर) |
| सा.क्रं.२/नि.क्रं. २४ | पिडीता | पिडीता (फितुर) |
| सा.क्रं.३/नि.क्रं.२७ | संजय सुखलाल साळुंके | मुख्याध्यापक |
| सा.क्रं.४/नि.क्रं.३४ | ताहेर हमीद पटेल | तपासिक अंमलदार |

ब. बचावाचे साक्षीदार

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार , जर असल्यास

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक

अ . अभियोग पक्ष

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.क्रं.२३/सा.क्रं.१ | फिर्यादीचा फिर्यादवरील अंगठा |
| २ | नि.क्रं.२५/अ/ सा.क्रं.२ | पिडीतेची तिच्या जवाबावरील सही |
| ३ | नि.क्रं.२६/सा.क्रं.२ | पिडीतेची कलम १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाबावरील सही |
| ४ | नि.क्रं.२८/सा.क्रं.३ | पिडीतेचे बोनाफाईड प्रमाणपत्र |
| ५ | नि.क्रं.३५/सा.क्र.४ | पिडीतेचा १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाब नोंदविण्यासाठी न्यायालयाला दिलेले पत्र |
| ६ | नि.क्रं.३६ /सा.क्रं.४ | पिडीतेच्या कपडे जप्ती पंचनामा |
| ७ | नि.क्रं.३७/सा.क्रं.४ | आरोपीच्या कपडे जप्ती पंचनामा |
| ८ | नि.क्रं.३८ व ३९/सा.क्रं.४ | मुद्देमाल पावत्या |
| ९ | नि.क्रं.४०/सा.क्रं.४ | सी.ए.ला आरोपी व पिडीतेचे कपडे व रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठविल्याबाबतचे पत्र |
| १० | नि.क्रं.४१/सा.क्रं.४ | घटनास्थळाचा पंचनामा |
| ११ | नि.क्रं.४२/सा.क्रं.४ | अटक पंचनामा |
| १२ | नि.क्रं.४३/सा.क्रं.४ | सी.ए.कार्यालयाला पाठविलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| १३ | नि.क्रं.४३ए /सा.क्रं.४ | पोहोंच पावती |
| १४ | नि.क्रं.४४/सा.क्रं.४ | डीएनए कीटची मागणी करणारे सी.ए.कार्यालयाला पत्र |
| १५ | नि.क्र.४५/ सा.क्र.४ | डिएनए सॅम्पल मिळण्यासकरीता वैदयकीय अधिकारी यांना पाठविलेले पत्र |
| १६ | नि.क्र.४६/ सा.क्र.४ | डिएनए चे नमुने रासायनिक प्रयोग शाळा औरंगाबाद यांना पाठविल्याबाबतचे पत्र |
| १७ | नि.क्र.४७/ सा.क्र.४ | रासायनिक पयोग शाळेने डिएनए चे नमुने मिळाल्या बाबतची पोच पावती |
| १८ | नि.क्र.४८/ सा.क्र.४ | फिर्यादीच्या पुरवणी जबाबातील अधोरेखांकीत भाग 'ब' |
| १९ | नि.क्रं.४९ व ५०/सा.क्रं.४ | फिर्यादीच्या पुरवणी जबाबातील अधोरेखांकीत भाग 'अ' व 'क' |

ब. <u>बचाव पक्षाने मान्य केलेला कागदोपत्री पुरावा</u>

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रं. ४१ | घटनास्थळाचा पंचनामा |

क. <u>न्यायालयीन निशाणी क्रमांक</u>

| अ.क्रं | वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. <u>जप्त वस्तु</u>

| अ.क्रं | जप्त वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

न्यायनिर्णय
( पारीत दिनांक ०४.०५.२०२६ )

१. आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६, ३७६ (२) (एन) व प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड फ्रॉम सेक्सुअल ऑफसेन्स कायदयाचे कलम ४ ॲक्टन्वये अपराध केल्याचे दोषारोप आहेत.

२. अभियोग पक्षाचे कथन प्रथम माहिती अहवाल प्रमाणे संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे :-

पिडीतेचे आई हिने फिर्याद दिली की, दि.०३.०८.२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजेच्या सुमारास पिडीतीची आई व पिडीता या दोघी धुणे भांडयाचे काम करण्यासाठी गेले असता, पिडीतेच्या आईने पिडीतेला सांगितले की, " मी तेथे काम करते, तु आपल्या घरी निघुन जा''. पिडीतेची आई धुणे भांडयाचे काम आटपुन पुन्हा घरी गेले असता, पिडीतेच्या आईला पिडीता ही घरी दिसुन आली नाही. त्यामुळे पिडीतेच्या आईने व त्यांच्या मुलाने पिडीतेचा शोध घेतला असता पिडीता मिळुन आली नाही म्हणुन त्यांनी अज्ञात व्यक्तीने पिडीतेस पळवुन नेल्याबाबतची फिर्यादी वैजापुर पोलीस स्टेशन येथे दाखल केली.

तपासाच्या दरम्यान पिडीता मिळुन आली. पिडीतेने तिच्या बयाणात सांगीतले की आरोपी नातेवाईक असल्याने त्याच्याशी तिचे प्रेम झाले. ते दोघे वर्षभरापासुन एकमेकांना भेटत होते. तिने व आरोपीने ०५.०२.२०२१ रोजी मंदीरामधे आरोपीसोबत गपचुप लग्न केले व त्यानंतर ती तिच्या आईसोबत राहत होती. दिनांक ०३.०८.२०२१ रोजी ती आरोपीसोबत नाशिक येथे गेली व त्या दरम्यान त्यांचे शारीरिक

संबंध आले. ती आरोपीपासुन सहा महिन्याची गरोदर आहे. दिनांक ०६.०९.२०२१ रोजी ती पोलीसठाण्यात हजर झाली.

३. उपरोक्त फिर्यादीवरुन अपराध क्रमांक ३२३/२०२१ कलम ३६३ भादंवी प्रमाणे वैजापुर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला होता व त्यानंतर कलमवाढ करण्यात आली. सरुवातीला गुन्हयातील तपास हा पोलीस उपनिरीक्षक ताहेर अमीर पटेल यांनी केला. तपासामधे त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जवाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले, न्यायालयास पत्र देवुन पिडीतेचा कलम १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाब हस्तगत केला. आरोपीला अटक केली, पिडीता व आरोपीचे कपडे जप्त करुन जप्ती पंचनामे तयार केले व मुद्देमला पावती तयार केल्या, पिडीता व आरोपीचे कपडे रासायीनक प्रयोगशाळेत तपासासाठी पाठविले, पिडीतेचा प्रवेश निर्गम उतारा मिळण्यासाठी पत्र देवुन तो हस्तगत केला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १४ प्रमाणे दोषारोप ठेवले. आरोपीने दोषारोपास कबुली दिली नाही. त्यामुळे त्यांची संपरीक्षा करण्यात आली. सरकार पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण चार साक्षीदार तपासले.

५. त्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब

नि.क्र.५१ वर घेण्यात आला. आरोपीनी त्यांच्या जवाबामधे त्याच्याविरुध्दचे साक्षीदारांनी दिलेले सर्व पुरावा नाकारला व असा बचाव घेतला की, त्याच्या विरुध्द प्रस्तुची खोटी केस दाखल केलेली आहे. आरोपीने बचावार्थ स्वतंत्र पुरावा दिला नाही.

६. <u>अभियोगपक्षाचे युक्तिवाद</u> **:-**

सुविदय सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.गंडे यांनी अभियोग पक्षाने घेतलेल्या पुराव्याकडे लक्ष वेधुन यांनी प्रतिपादन केले की, मुख्याध्यापक सा.क्रं.३ यांच्याकडुन अभियोग पक्षाने पिडीता अल्पवयीन असल्याचे सिध्द केले आहे व तपासिक अंमलदार सा.क्र.४ यांचा पुरावा फिर्यादीतील कथनाप्रमाणे असुन एकमेकांशी सुसंगत आहे. त्यांनी साक्षीदारांचे जवाब सिध्द केले आहेत. त्यामुळे अभियोग पक्षाने दिलेला मौखिक पुरावा एकमेकांशी सुसंगत आहे. म्हणून त्यांनी प्रतिपादन केले की आरोपीला दोषी धरण्यात यावे.

७. <u>बचावपक्षाचा युक्तिवाद</u> **:-**

प्रत्युत्तरार्थ आरोपींचे सुविदय विधिज्ञ राफे पीरजादा यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे महत्वाचे साक्षीदार पिडीता व फिर्यादी आरोपीविरुध्द काही एक त्याच्या पुराव्यात सांगीतलेले नाही. तसेच त्यांनी प्रतिपादन केले की अभियोग पक्षाचे साक्षीदार फिर्यादी व पिडीता हे अभियोग पक्षास फितूर झालेले असुन अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. सदर पुराव्यावरुन स्पष्ट होत नाही की आरोपीने पिडीतेचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार

केला, तिचे लैंगिक शोषण केले हे सिध्द होत नाही. त्यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे कथन अविश्वसनीय असे आहे व म्हणून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

८. न्यायालयाचे विचारात उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे आहेतः-

| अं.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, कथीत घटनेवेळी पिडीत मुलगी ही अल्पवयीन होती ? | होय |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय दिनांक ०३.०८.२०२१ रोजी सकाळी ०१.०० वाजेच्या सुमारास अण्णा भाऊ साठे नगर, वैजापुर, जि. औरंगाबाद येथुन आरोपीने पिडीता अल्पवयीन असतांना तिच्या आई-वडिलांच्या अखत्यारीतुन त्याच्या परवानगी शिवाय पिडीतेचे अपहरण करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने पीडितेला अपहरण करुन व तिला आरोपीशी बेकायदेशीर संभोग करण्यास भाग पाडुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३६६ अन्वयेचा शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय आरोपीने पिडीत अल्पवयीन मुलीवर तिच्या संमतीशिवाय संभोग करुन तिच्यावर बलात्कार करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एन) नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ५ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार केले आणि त्याद्वारे पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत गुन्हा | |

| | | |
|---|---|---|
| | केला ? | नाही |
| ६ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

९. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण चार साक्षीदार तपासले आहेत.

<u>मुद्दा क्रमांक १</u> -

१०. पिडीता घटनेच्या वेळी अज्ञान होती हे सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने पिडीता, तिची आई व मुख्याध्यापक यांना तपासले. फिर्यादी / पिडीतेची आई सा.क्रं.१ व पिडीता सा.क्रं.२ या दोघींही अभियोगपक्षाच्या महत्वाच्या साक्षीदार आहेत परंतु दोघींनीही त्यांच्या पुराव्यातमधे पिडीतेची जन्म तारीख सांगता येणार नसल्याचे सांगीतले. साक्षीदार क्रं.३ मुख्याध्यापक यांच्या पुराव्यात त्यांनी सांगीतले की पिडीतेने त्यांच्या शाळेमध्ये नववीच्या वर्गात प्रवेश घेतला होता. पिडीताने त्यांची शाळा २०२३ मध्ये १० वी मध्ये सोडली होती. पिडीताचे मुळ प्रवेश रजिस्टर अनुक्रमांक २०९४८ अन्वये प्रवेश घेण्यात आला होता. त्याप्रमाणे पिडीतेची जन्म तारीख १५.०२.२००५ आहे. सदरचा साक्षीदार पुढे त्यांच्या जवाबात असेही सांगतात की त्यांच्या शाळेच्या मुळ रजिष्टरच्या नोंदीप्रमाणे त्यांच्या पुर्वीचे मुख्याध्यापक यांनी पिडीतेचे बोनाफाईड प्रमाणपत्र निशाणी २८ प्रमाणे दिले होते.

११. कलम १२ (३) जे.जे.नियम २००७ मधे उल्लेख केलेला आहे की प्रमाणपत्र

पहिल्या शाळेतुन वितरित करण्यात आलेले असल्यास त्या प्रमाणपत्रास मान्यता दिलेली आहे. तसेच कलम ९४ च्या दरुस्तीचा जे.जे.कायदा २०१५ मधे देखील सदरची बाब नमुद केलेली आहे. त्यामुळे वरील नियमांचे अवलोकन केले असता न.पा.दिलेला पिडीतेचा जन्माचा दाखला हा पिडीतेचा वय निश्चित करण्यास मान्य ठरते.

१२. प्रस्तुतच्या खटल्यामधे कलम १२ (३) जे.जे.नियम २००७ व कलम ९४ च्या दरुस्तीचा जे.जे.कायदा २०१५ मधे उल्लेखीत केल्याप्रमाणे अभियोग पक्षाने पिडीतेचा जन्म दाखला किंवा शाळेचे प्रवेश निर्गम उतारा सादर केला नाही तर पिडीतेचे शाळेने दिलेले बोनाफाईड प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतु कायदयाप्रमाणे सदर बोनाफाईड प्रमाणपत्रास मान्यता नाही. म्हणुन सदर बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे पिडीतेची जन्म तारीख १५.०२.२००५ आहे असे म्हणता येत नाही. या व्यतीरिक्त अभियोग पक्षाने पिडीतेचे जन्म प्रमाणपत्र किंवा अंगनवाडीचा जन्म दाखला अथवा शाळेने निर्गमित केलेले प्रवेश निर्गम उतारा अभिलेखावर दाखल केला नसल्याने घटनेच्या वेळी पिडीता ही अज्ञान होती हे सिध्द होउ शकले नाही. म्हणुन मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

हे<u>मुद्दा क्रमांक २ ते ६ करीता</u> -

१३. मुद्दे क्रं. २ ते ६ हे एकमेकांवर अवलंबुन व त्यावरील पुरावा निगडीत असल्याने एकत्रीत कारण मिमांसासाठी पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विचारार्थ घेतले आहेत.

<u>पुराव्याचे अवलोकन</u> -

१४. प्रथमतः अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणजेच फिर्यादीच्या आईस तपासले. तिच्या पुराव्यात असे आले आहे की पिडीता ही तिची मुलगी आहे. परंतु तिने घटनेबाबत काही सांगतले नाही. तसेच तिने तिच्या फिर्यादमधील व तिचा पुरवणी जवाबामधील मजकुर तिला माहित नसल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे फिर्यादी/पिडीतेची आई अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य करीत नसल्याने तिला फितुर घोषित करुन उलटतपास घेतला असता तिने एकंदरीत तिच्या फिर्यादमधील मजकुर नाकारला आहे व मान्य केले आहे की पिडीता आरोपीसोबत लग्न करुन राहत व आहेत व तिला आरोपीपासुन दोन मुले आहेत. म्हणुन फिर्यादीचा पुरावा हा आरोपीस दोषी ठरविण्याइतपत नसल्याने तिचा पुरावा पुरक म्हणता येणार नाही.

१५. अभियोग पक्षाने पिडीतेस निशाणी २४ प्रमाणे तपासले. पिडीतेला घटनेची तारीख व वार सांगता आली नाही. तिला तिची जन्म तारीख सांगता येत नाही. पिडीतेने अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केले नसल्याने तिला सरकार पक्षाने तिला फितुर करुन उलटतपास घेतला असता तिने तिच्यासोबत झालेली एकंदरीत घटना नाकारली आहे. तिच्या जवाबातील अधोरेखांकित भाग अ तिने पोलीसांना सांगीतला नव्हता असे सांगीतले. तसेच ती सांगते की तिचा न्यायालयात जवाब नोंदविला किंवा नाही याबाबत तिला आठवत नाही असे सांगीतले. तसेच तिने मान्य केले आहे की तिचे आरोपीसोबत लग्न झाले असुन तिला दोन मुल आहेत. पिडीतेचा पुरावा लक्षात घेतला असे निर्दशनास

येते की प्रकरणातील सर्वात महत्वाचा पुरावा म्हणुन पिडीतेच्या पुराव्याला महत्व आहे परंतु तिचा पुरावा अभियोग पक्षास पुष्ठर्थ व पुरक नाही.

१६. अभियोग पक्षाने साक्षीदार क्रमांक ४ ताहेर हमीद पटेल यांना तपासले. सदरचा साक्षीदार तपासिक अंमलदार असुन त्यांनी ज्या रितीने गुन्हयाचा तपास केला त्याप्रमाणे त्यांनी न्यायालयात जवाब दिला आहे. त्यांच्या पुराव्यामधे त्यांनी त्यांनी तपासामध्ये नियमित तपास करुन, आरोपीस अटक केली, घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रामणे नोंदविले व इतर कागदोपत्री पुरावा गोळा केला व तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

१७. अभिलेखाचे परीक्षण केले असता असे निर्दशनास येते की वैदयकीय अधिकारी यांना वारंवार समन्स निशाणी २७, २८, २९, ३१, ३२ प्रमाणे समन्स काढुन देखील वैदयकीय अधिकारी यांना तपासण्यास असमर्थ ठरले आहे. त्यामुळे पिडीतेचा वैदयकीय अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे परंतु वैदयकीय अधिकारी यांना तपासले नसल्याने तो सिध्द होउ शकला नाही.

१८. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होत आहे की अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोष सिध्द करण्यासाठी प्रथम साक्षीदार पडिता, फिर्यादी यांना तपासले आहे. परंतु दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केले

नाही व एकंदरीत घटनास नाकारली आहे व दोन्हीही साक्षीदारांनी मान्य केले आहे की पिडीतेचे आरोपीसोबत लग्न झाले असुन त्यांना त्या लग्नसंबंधातुन दोन मुले आहेत. त्यामुळे असे दिसते की म्हणुनच पिडीता व तिची आई फिर्यादी आरोपीविरुध्द काहीएक सांगत नाहीत. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्यभुत ठरत नाही.

१९. आरोपीने पिडीतेवर तिच्या समंतीविना वारंवार बलात्कार केला ही बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने इतर कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. जरी अभियोग पक्षाने तपासिक अंमलदार यांना तपासले आहे व त्यांच्या पुराव्यात त्यांनी पिडीतेचा न्यायालयात नोंदविलेला जवाब, घटनास्थळाचा, आरोपी व पिडीतेचा कपडे जप्ती पंचनामा, आरोपीचा अटकेचा पंचनामा शाबीत केले आहेत. तसेच त्यांनी फिर्यादीच्या पुरवणी जवाबातील अधोरेखांकित अ ते क त्यांनी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले असे सांगुन ते जवाब निशाणी ४८ ते ५० प्रमाणे सिध्द केले आहेत. परंतु महत्वाचे म्हणजे फिर्यादीच तिच्या फिर्यादीच्या कथनाच्या विसंगत पुरावा देत असल्याने जरी ते अधोरेखांकित भाग तपासिक अंमलदाराच्या पुराव्यात सिध्द केले असले तरी तपासिक अंमलदाराचा पुरावा हा परिपुर्ण पुरावा होवु शकत नाही व त्यांचा पुरावा औपचारिक ठरतो आणि तो आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यास सहाय्यभुत होत नाही.

२०. सबब कथीत घटनेबाबत कुठलाही परीपुर्ण व ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणुन असा निष्कर्ष निघतो की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे

दोषारोप संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करु शकलेले नाही. त्यामुळे आरोपी हा सदर दोषारोपांतुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मुद्दे क्र. २ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ६ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे-

आदेश

१. आरोपी सुनिल गोरख बत्तीसे याची भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६ व ३७६(२)(एन) व पोक्सो कायदयाचे कलम ३अ सहकलम ४ प्रोव्हीबिशन ऑफ चाईल्ड मॅरेज ॲक्ट यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल फिर्यादीचे कपडे जसे की, पिडीतेची लाल रंगाची लेंगीन व जांभळया रंगाची निकर तसेच आरोपीची लाल भुरकट रंगाची अंडरविअर व एक पांढ-या रंगाची फुल जिन्स पॅन्ट, अपीलाचा कालावधी संपल्यावर त्याची विल्हेवाट लावावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये आरोपी यांनी रुपये २५,०००/- चा वैयक्तिक जात मुचलका व जामिनदार दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यांत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SUSHMA
KARUNESH
UPADHYAY
Date: 2026.05.04
15:44:14 +0530

दिनांक - ०४.०५.२०२६

(श्रीमती एस. के. उपाध्याय)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
वैजापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer : R.V.Kulkarni
Name of the Court : Smt. S. K. Upadhyay, Addl. Sessions Judge,Vaijapur.
Date on which judgment pronounced : 04.05.2026
Date of direct dictation : 04.05.2026
Judgment checked and signed
by the presiding officer on : 04.05.2026
Judgment uploaded on : 04.05.2026